# अर्ज

**प्रति,**

**मा.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**तथा, सदस्य सचिव, कार्यकारी समिती**
**जलयुक्त शिवार अभियान**
**सोलापूर.**

**विषय- जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मधील कामांचे मुल्यमापन करणेबाबत..**

**संदर्भ- आपली दिनांक....... रोजीची........... दैनिकामधील जाहिरात**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाची वरील संदर्भान्वये जाहिरात वाचली सदर जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे व आपल्या कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या अटि व शर्तीप्रमाणे आमची संस्था....................................................... आपणाकडे अर्ज सादर करित आहे. अर्जासोबत सादर केलेली माहिती पुर्णपणे खरी असुन, भविष्यात किंवा छाननी दरम्यान सदर माहितीच्या सत्यतेबाबत काही प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. यामध्ये जिल्हास्तरीय समितीने घेतलेला निर्णय मला मान्य राहील.

**सोबत- १.लिफाफा क्र.१ - तांत्रिक निविदा**
**२.लिफाफा क्र.२ - व्यापारी निविदा**

**स्वाक्षरी**

**१. लिफाफा क्र.१ मध्ये –**

१.संस्थचे नोंदणी प्रमाणपत्र

२.सर्व अटि व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरीत कागदपत्रे

३.यापुर्वी किमान एका शासकीय विभागाच्या जलसंधारण कामाची तपासणी केलेबाबत अनुभव प्रमाणपत्र किंवा कार्यारंभ आदेशाची प्रत

४.आयकर/व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्रे

५.सन २०१५-१६, सन २०१६-१७ या दोन वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल.

६.संचालक मंडळाची/पदाधिकारीची यादी अधिकृत स्वाक्षरीसहीत.

७.तांत्रिक मनुष्यबळाची यादी किमान- १.स्थापत्य अभियंता,२.कृषि पदवीधर ३.मृद व जलसंधारण विशेषज्ञ अनिवार्य

**२.लिफाफा क्र.२ मध्ये –**

१.यामध्ये मुख्य निविदा ज्यामध्ये कामावर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या प्रमाणात दर असतील .सर्व कामांच्या तपासणीसाठी एकच दर दयावा.

(उदा- कामांवर प्रत्यक्ष झालेला खर्च १ लाख रु.असेल तर त्याच्या ०.४० टक्के रकमेत आम्ही काम करण्यास तयार आहोत.)

२. सदर दर अटी व शर्ती मध्ये नमूद असलेल्या सर्व बाबी सहित असावा.

वरील दोन्ही लिफाफे एका लिफाफ्यामध्ये घालुन सिलबंद करुन दि.२२/०९/२०१७ पर्यंत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात , जिल्हा पाणलोट कक्षात सादर करावेत.

**अटी व शर्ती-**

१. जलयुक्त शिवार योजना सन २०१६-१७ अंतर्गत पुर्ण केलेली ७१९५ कामांचे शासनांच्या मापदंडानुसार भौतिक व आर्थिक दृष्टीने तपासणी करणे करिता कामावरील प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत दर सादर करावा.

२. जलसंधारण कामे तपासणी करिता अंतर्गत वाहनव्यवस्था , तांत्रिक साहित्य, मनुष्यबळ, संगणक साहित्य, तांत्रिक व्यक्ती इ. सक्षम असणे आवश्यक असेल.

३. जलसंधारण कामे मुल्यमापन निश्चित कालावधीत करण्याचे असल्याने सक्षम संस्थांनी निविदा सादर करावी. (मुदत वाढवून दिली जाणार नाही)

४. यापुर्वी शासकीय जलसंधारण कामांचे मुल्यमापन केलेले अनुभव व आदेशाची प्रत सादर करावी. (किमान एक)

५. करारनामा/कार्यरंभ आदेश झाल्यानंतर ६० दिवसांत सर्व कामांचे मुल्यमापन पुर्ण करुन ३० दिवसात मुल्यमापन अंतिम अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. मुल्यमापन अथवा अहवाल ठराविक मुदतीत सादर न केल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल. (अदा करावयाच्या रकमेच्या प्रत्येक पंधरा दिवसांकरिता ५ टक्के रक्कम वसुल केली जाईल)

६. कामाचा मोबदला अदा करावयाची कार्यपध्दती –

१.करारनामा/कार्यारंभ आदेशानंतर कामाची सुरवात झाल्यानंतर १० टक्के.

२. मुल्यमापन पुर्ण केल्यानंतर ५० टक्के.

३.अंतिम अहवाल सादर करुन पडताळणी जिल्हास्तरावर केल्यानंतर ४० टक्के रक्कम अदा केली जाईल.

७. जलसंधारण कामाचे मुल्यमापन करताना काही वादातीत प्रसंग निर्माण झाल्यावर निर्णय घेण्याचे अंतिम जिल्हास्तरीय समितीस राहील.जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम राहील, याबाबत कोणत्याही न्यायालयात आपल्याला दाद मागता येणार नाही.

८. संस्थेने हाती घेतलेले मुल्यमापन काम असमाधानकारक आढल्यास कोणत्याही क्षणी कार्यारंभ आदेश रद्द करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. झालेल्या मुल्यमापनांची रक्कम अदा करावयाची कि नाही याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.

९. मुल्यमापन चालू असताना किंवा पुर्ण झाल्यावर अहवालाची माहिती जिल्हास्तरीय समिती शिवाय इ.कोणतीही संस्था व्यक्ती, प्रसिध्दी व माध्यम यांना देता येणार नाही.

१०. याबाबतचा निर्णय घेण्याचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय समितीला राहतील.

११. संस्थेला स्वतः मुल्यमापन करावे लागेल त्यांच्या वतीने इतरांची नियुक्ती केल्यास मुल्यमापन कामांस मान्यता मिळणार नाही.

१२. अर्ज सादर करताना सोलापूर व बाहेरील जिल्हयाचे संस्थाही अर्ज करु शकतील.

१३. कामांची संख्या विचारात घेता प्रत्येक २ तालुक्याला एका संस्थेची निवड करावयाची आहे. यास्तव आलेल्या निविदा जिल्हास्तरीय समिती व आपणासमोर उघडून त्यातील कमीत कमी दराने पात्र संस्थांना कामाचे वाटप केले जाईल. या नियमामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हास्तरीय समितीला राहील.